# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक

डॉ. नविन केशव सोळंके

SHIVAJI COLLEGE
HINGOLI

**Principal**
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक
डॉ. नविन केशव सोळंके
नागनाथ महाविद्यालय,
औंढा (नागनाथ), जि. हिंगोली

ग्लोबल पब्लिकेशन

Principal
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

SHIVAJI COLLEGE
HINGOLI


| अ.क्र | विवरण | पृ क्र |
|---|---|---|
| १० | भाषा आणि संशोधन : एक अभ्यास<br>**डॉ. सुनिल कांबळे** | ६ |
| ११ | राज्यशास्त्रातील संशोधन पध्दती<br>**डॉ. एस. यु. ढाले** | ७ |
| १२ | संशोधनात उपकल्पना किंवा गृहितकाचे महत्व<br>**डॉ. कल्याण कदम** | ८० |
| १३ | सामाजिक संशोधनामध्ये साहित्यांच्या पुनरावलोकनाचे महत्व<br>**के.जे. खंदारे** | ८६ |

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# प्रकरण १०

# भाषा आणि संशोधन : एक अभ्यास

**डॉ. सुनिल कांबळे**
हिंदी विभाग, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

**प्रस्तावना :-**

भाषा आणि संशोधन हे दोन्ही वेगळे आहेत. याचा सूक्ष्मरीतीने अभ्यास करण्या अगोदर आपण भाषा म्हणजे काय? आणि भाषा समाजाला काय शिकविते, समाजाची जडणघडण मध्ये भाषा अतिशय महत्त्वाची असते. या सर्व गोष्टीचा आपण आगोदर अभ्यास केल्यानंतर संशोधन म्हणजे काय? समाजाला संशोधनाची काय गरज असते? या सर्व गोष्टीचा अभ्यास आपणाला या शोधनिबंधातून भाषा आणि संशोधन कसा संबंध आहे याचा अभ्यास करावयाचे आहे. भाषा म्हणजे काय? भाषेचा आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध काय असतो - भाषेमूळे मानवी समाजातील विचार सूचतात याची सर्व कल्पना भाषेमूळे कसा येतो भाषा ही समाजाची महत्वपूर्ण जबाबदारी पूर्ण करीत असत भाषा म्हणजे मानवी व्यवहार पूर्ण करणा-या माध्यमास भाषा असे म्हटले जाते. भाषेमुळेच समाजातील संपूर्ण व्यवहार पूर्ण होतात. मानवी मूखावाटे बाहेर पडणा-या ध्वनीस भाषा असे म्हणतात. साधारणतः भाषा म्हणजे मानवी भावभावना विचार प्रकट करणारे साधनास भाषा असे म्हणतात. अनादी काळात माणसानेच भाषेचा शोध लावला असून जगात *किती तरी भाषा आहेत. मराठी, हिंदी,* इंग्रजी, फ्रेंच, जपानी *या* संपूर्ण भाषेचा शोध मानवानेच लावले आहेत. भाषेचा उदय हा मानसाच्या भावभावना, विचार, कल्पना यातून *भाषा ही समजा* ... निर्माण झाली, असून समाज भाषेशिवाय आपले जीवन जगू शकत ... *अस्तित्व तयार करू शकत* नाही. म्हणून भाषेला मानवी समाजात खूप ... *असते.*

Principal
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



भाषा ही एक मानव निर्मित असून ती माणसाने आपले व्यवहार व भावभावना ऐकमेकाच्या समजून घेण्या करीता भाषेचा जन्म झालेला आहे.

उदा. चिव चिव म्हणजे चिमणी

काव-काव म्हणजे कावळा

हांभा-हांभा म्हणजे गाय

म्याँव म्याँव म्हणजे मांजर

असे मानवानिच एखाद्या प्राण्याच्या ध्वनीवरुनच त्याच्या नावाची आणि प्राण्याची ओळख जगाला करून दिलेली आहे. माणूस आगोदर रानटी अवस्थेत होता. त्याना कोणताच विचार करण्याची क्षमता नव्हती, बुध्दीचा तो कधीही वापर करीत नव्हता. अशा काळात तो विविध ध्वनी काठीत असायचा जेव्हा माणसाला आपली गरज भागविण्याकरीता किंवा आपले विचार दुःख आनंद व्यक्त करण्याकरीता तो विशिष्ट ध्वनीचा आवाज काढत असायचा आणि आपले विचार भावना दुस-या माणसाला कळवित असावयाचा.

जेव्हा माणूस अतिशय आनंदी झालेला असेल तेंव्हा तो विशिष्ट ध्वनी काढीत असायचा तेव्हा दुसऱ्या माणसाला समजायचे की आज आनंद आहे. तो हासत उड्या मारीत असायचे. जर संकट आले असेल तर तो विशिष्ट असा आवाज काढून माणसाला संकटाची जाणीव करून देत असे या भाषेला आज आपण भाषा विज्ञानात ध्वनीची भाषा असे म्हटले जाते. माणसाने सर्व भाषेच्या आगोदर विशिष्ट ध्वनी आणि आंगिक हावभावाच्या भाषेचा वापर केला. राग व्यक्त करण्याकरीता तो दात आणि ओठ खाऊ लागला आणि दिशा दाखविण्या करीता विशिष्ट हातवारे शरीराच्या अवयवाचा उपयोग करू लागला. तेंव्हा माणसाच्या भाषेची आणि समाजातील प्रश्नाची माहिती मिळू लगाली. चिन्हाची भाषा समाजामध्ये निर्माण झाली. ज्ञानाचे प्रतिक म्हणून ज्योत प्रज्वलित करू लागले. गुलाब फुलाचे प्रेमाचे प्रतिक म्हणून वापर करू लागले. म्हणजेच माणसांनी भाषेचा जन्म होण्या अगोदर भोषचा वापर म्हणून आपल्या शरीराच्या अवयवाचा वापर करू लागला आणि आपले विचार भावना कल्पना समाजात सांगू लागला. आणि भाषेचा उदय झाला.

साधारणपणे भाषा ही एक समाजी संपत्ती असून कोणताही माणूस भाषा शिकू शकतो आणि भाषेचा वापर करून आपला व्यवहार पूर्ण करीता

Principal
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



असतो. समाजातील भाषेशिवाय व्यवहार विचार भावना पूर्ण करू शकत नाही.

भाषेशिवाय ज्ञान मिळत नसते. ज्ञानीवंत व्यक्ती निर्माण झाल्याशिवाय संशोधन होत नाही. संशोधन झाल्यानंतर एक आदर्श समाज निर्माण होत नाही. भाषेशिवाय समाजाची प्रगती आणि विकास होत नाही. म्हणून संशोधन करण्याकरिता भाषेची खूप आवश्यकता असते. भाषेचा आणि संशोधनाचा समाजाला प्रगत राष्ट्राकडे घेऊन जाण्याचा एक माध्यम म्हणून भाषेकडे पाहिले जाते.

**संशोधन आणि भाषा याचा परस्पर संबंध :-**

समाजिक संशोधन म्हणजे समाजातील वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करणे यास संशोधन असे म्हटले जाते.

समाजातील विविध घटना प्रसंग समस्याचा शोध वैज्ञानिक पध्दतीनूसार समाजाचे नियम शोधन काढणे यास सामाजिक संशोधनाचे कार्य असते. समाजातील समाजिक समस्या जाणून घेण समाजातील समस्याचा परिणाम आणि उपाय शोधून काढणे इ.घटना प्रसंगाचे कार्य सामाजिक संशोधनातून करावे लागते.

**संशोधन म्हणजे काय?**

समाजातील एखादी नवीन घटनेचा स अ म्हणजे समग्र (संपूर्ण) घटनेचा बारकाईने शोध घेणे म्हणजे संशोधन होय. संशोधनात जिज्ञासा आणि सूक्ष्म निरक्षण अत्यंत आवश्यक असते. समाजातील घटना समजून घेण्याकरीता अत्यंत बारीक नजर असणे महत्वाचे असते. तेव्हाच समाजाचे संशोधन होताना दिसते.

**रेडमन आणि मोरी :-**

या सामाजिक अभ्यासकाने सामाजिक संशोधनाची व्याख्या केलेली आहे 'नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याकरीता जी पध्दतीचा वापर केला आहे. त्यास संशोधन असे म्हटले जाते.'

**पी.व्ही.अंग :-**

सामाजिक संशोधन म्हणजे 'नवीन आणि जून्या तथ्यांचा एखाद्या समस्येचा निसर्ग नियम पध्दतने संशोधन किंवा निरक्षण करणे यास संशोधन असे म्हणतात.'

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



**विल्यमस :-**

या समाजिक तज्ञाने सांगितले आहे की, 'मानवी समूहाच्या अभ्यासावर केंद्रीत झालेले संशोधन आणि वैज्ञानिक निसर्गामध्ये व नियमामध्ये परस्पर संशोधन करणे अत्यंत महत्वाचे आहे.'

संशोधन आणि भाषा याचा बारकाईने अभ्यास करणा-या शास्त्रास, भाषाशास्त्र म्हणतात त्यास समाज भाषा विज्ञान असेही म्हटले जाते.

'समाज भाषा विज्ञान हे समाज आणि भाषेचा अभ्यास करीत असतो.'

भाषाविज्ञान म्हणजे भाषेचा अभ्यास करणारे शास्त्र असून ज्यामध्ये भाषा आणि भाषेची उत्पत्ती स्वरूप, विकास, भाषेची ध्वनी, भाषेची रूपे, भाषेचा आणि समाजतील संबंध इ. बाबीचा अभ्यास केले जाते यास 'भाषाविज्ञान' असे म्हटले जाते.

भाषा विज्ञान मध्ये दोन प्रयोगाचा (शब्दाचा) उपयोग केलेला दिसून येतो. एक भाषा आणि दूसरे विज्ञान भाषा आणि भाषेचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करण्याचे काम भाषा विज्ञान करीत असते. यातूनच समाजाचे संशोधन होत असते. उदा. भाषेवरुन व्यक्तीची आणि प्रदेशाची ओळख होते. भाषेवरून माणसाची योग्यता, विद्वता आणि नम्रता अशा संपूर्ण व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाची ओळख होताना दिसते. तेंव्हा हा समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, विद्वान व्यक्ती आहे असे समजले जाते. मराठवाड्यातील व्यक्ती खान्देशी व्यक्ती, इंग्लडच्या व्यक्ती, जपानच्या व्यक्ती अशी ओळख भाषेवरून होताना दिसते. म्हणून भाषेचा आणि संशोधनाचा खूप जवळचा संबंध आहे.

समाज आणि भाषेचे क्षेत्र, संशोधन अशा चार महत्वाच्या गोष्टी मानल्या जातात म्हणून संशोधन करीत असताना तो व्यक्ती कोणत्या प्रदेशातला आहे. त्याची भाषा कोणती आहे आणि तो समाज या घटनेचा अभ्यास संशोधनातून केला जातो. म्हणून समाजातील असे अनेक संशोधन झालेले आहे. भाषेतील विविध प्रांत वर्ग लिंग जात धर्माचा बारकाईने अभ्यास होताना दिसते. म्हणून भाषा विज्ञानात समाजातील संपूर्ण भाषा, प्रतिके, संप्रेक्षण शब्दरचना, घटना प्रंसागातील विविध व्यवहारातील रूपे अभ्यासताना दिसून येते. सामाजिक संशोधन हे त्या भाषेमधूनच केले जाते. इंग्लड मधील व्यक्ती हा त्या समाजातील संशोधन इंग्रजी भाषेतूनच करताना दिसते तर भारतीय माणूस हा विशिष्ट

Principal
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

SHIVAJI COLLEGE HINGOLI

प्रदेशात राहतो तेंव्हा ज्या प्रातांची भाषा आहे त्या भाषेतूनच संशोधन करीत असतो. उदा. महाराष्ट्र मराठा भाषेतून, आंध्रप्रदेश तेलगू, कर्नाटक राज्यातील व्यक्ती कन्नड भाषेतून संशोधनाची प्रक्रिया पूर्ण करीत असतो.

**सारांश :-**

'भाषा आणि संशोधन' यांचा समाजामध्ये अनन्य साधारण असे महत्व आहे. भाषेशिवाय कोणतेही संशेधन होऊ शकत नाही. समाजातील कोणत्याही स्वरूपाचे संशोधन करावयाचे असल्यास आपणास संशोधन करण्याअगोदर त्या समूहाच्या भाषेचा अभ्यास करावा लागतो नंतर संशोधन करून या भाषेचा आवलंब करावा लागतो. भाषा ही मानवी जीवनातील परिवर्तन करण्यासाठी भाषेचे स्थान खूप महत्वाचे असते, मानवी व्यवहार पूर्ण करण्यासाठी भाषा ही एक महत्त्वाची भूमीका बजावीत असते. मानवाच्या भाव भावना विचार व्यवहार व ज्ञान पूर्ण करण्यासाठी भाषा हे सर्वोत्तम माध्यम आहे. भाषा शिवाय कोणतेही ज्ञान आणि संशोधन मानव पूर्ण होऊ शकत नाही म्हणून भाषेला समाजामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान मानले जाते. भाषेची निर्मिती ही माणसानीच केली असून विविध प्रांतानूसार आपली भाषा मानवाने तयार केली असून तो पूर्ण व्यवहार व ज्ञान संशोधन आपल्या भाषेतूनच करीत असतो. समाजातील नवनवीन संशोधन व ज्ञान संपादन करण्यासाठी भाषेचा वापर केला जातो. शोध व संशोधन पुर्णत्व होण्यासाठी मानवाने भाषा हेच माध्यम वापरले आहे. म्हणून भाषा आणि संशोधन हे समाजात महत्त्वपूर्ण जबाबदारी पूर्ण करते.

## संदर्भ सूची :-


१) आधुनिक भाषाविज्ञानः वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, - मिलिंद द.द.मालशे-लोकवाड्य प्रकाशन, मुंबई २००९

२) मराठी वर्णनात्मक भाषा विज्ञान- महेंद कदम -स्नेह वर्धन प्रकाशन, पुणे

३) सामाजिक संशोधन पध्दती - सूनील मायी - डायमंड पब्लिकेशन पुणे

४) संशोधन पध्दती प्रक्रिया अंतरग -डॉ.दु.का.संत पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे

५) सामाजिक संशोधन पध्दती - प्रा.डॉ.प्रदिप आगलावे, पुणे प्रकाशन


**Principal**
**Shivaji College, Hingoli**
**Tq.Dist.Hingoli (MS)**